# नियमित दिवाणी दावा क्र. ६४/२००३ मधील निशाणी १५१ खालील आदेश.

(रामचंद्र सकुंडे व इतर वि. माधव सकुंडे व इतर)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

**प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

२. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व त्याचा कब्जा अलग व तुटक करुन मिळावा यासाठी दाखल केलेला आहे. वादी क्र. १ व त्याचे मुखत्यार दिपक सकुंडे हे सध्या पुणे येथे राहत आहेत. तसेच वादी क्र. २ सुरेश सकुंडे हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस वादी क्र. २अ ते २ड हे रेकॉर्डवर घेतले असुन वादी क्र. २इ ते २ड हे इचलकरंजी येथे राहत असतात.

३. त्यामुळे दाव्यात जबाब देण्यासाठी व त्याची तयारी करण्यासाठी जुलै २०१९ रोजी वादी हे अंबवडे येथे यवुन राहीले. त्यावेळेस दाव्या संबधी माहीती काढण्यासाठी चौकशी केली असता प्रतिवादी क्र. १ यांनी दावा कलम १ब मध्ये नमूद केलेली शेत जमीन गट नं. २९५ क्षेत्र १ हे. २७ आर एकूण क्षेत्र १ हे. ३५ आर पैकी सामाईकातील ५ आणे ४ पै दक्षिण बाजुचे क्षेत्र श्री. निवृत्ती सकुंडे रा. अंबवडे यांना २५,०००/– रुपयास दस्त नं. १८६/१९९७ ने गहाण स्वरुपी मुदत खरेदी दिल्याचे व सदर निवृत्ती सकुंडे यांचे सदर दावा मिळकतीस मुदत खरेदी पत्राने झालेल्या नोंदीच्या आधारे सदरची दावा मिळकत गट नं. २९५ मधील ५ आणे ४ पैचा दक्षिण बाजुचा ५ आणे ४ पैचा हिस्सा सदरील इसम निवृत्ती यांनी प्रतिवादी क्र. १ यांची मुले अशोक व आण्णा

यांच्या बायका अनुक्रमे शोभा सकुंडे व शीतल सकुंडे यांना प्रस्तुत दावा चालु असताना बेकायदेशीरपणे १ लाख रुपयास दिनांक २०/०६/२०१३ रोजी दस्त नं. २६/२०१९ ने विक्री केल्या आहेत. दाव्याचे काम चालु असताना दावा मिळकती संबधी वाद चालु असताना कोणालाही कळू न देता वादीने अपरोक्ष बेकायदेशीरपणे रद्द बातल पोकळीस्त असे खरेदीपत्राचे दस्त केल्याची माहीती वादी यांना शेजाऱ्यांकडून मिळाली. वादी हे पुणे येथे व वादी क्र. २अ हे परगावी राहत असल्याने त्यांना सदर दस्ता संबधीची माहीती मिळाली नाही. त्यामुळे ते त्या संदर्भातील दुरुस्ती दाव्यामध्ये करु इच्छीतात. तसेच दाव्यामध्ये शोभा सकुंडे, शितल सकुंडे व निवृत्ती सकुंडे यांना समाविष्ठ करु इच्छीतात. त्यामुळे वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दावा दुरुस्त करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

४. वादीच्या मते प्रस्तावीत दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची आहे. वाद मिळकती संबधी प्रकरणांची संख्या टाळण्यासाठी प्रस्तावीत दुरुस्ती आवश्यक आहे. प्रस्तावीत दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलत नाही. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती वादी तर्फे करण्यात आली.

५. प्रतिवादी क्र. १ यांनी निशाणी १६६ वर त्यांचे सविस्तर म्हणणे दाखल केले व अर्जातील कथनांना तीव्र आक्षेप नोंदविला. प्रतिवादीच्या मते वादीने जाणुन बुजुन प्रस्तुत दाव्यातील सत्य परिस्थीती लपवुन ठेवुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. वादीने मुळ दाव्यामध्ये दावा कलम १ब ही गट नं. २९५ क्षेत्र १ हे. २७ आर अशा संपुर्ण मिळकतीसाठी दावा दाखल केलेला होता. सदर दाव्यामध्ये वादीचा पुरावा झाल्यानंतर निशाणी ६७ ला

दिनांक २०/०८/२०११ रोजी दावा कलम १ब मधील दुरुस्ती करण्यासाठी वादीने अर्ज केला. सदरच्या अर्जामध्ये संपुर्ण हिस्सा यास काट देवुन यापैकी १० आणे ८ पै चे हिश्यासाठी दुरुस्ती मुळ दाव्यात करुन मागीतली. सदर दुरुस्ती अर्ज न्यायालयाने मंजूर करुन त्याप्रमाणे वादीने दिनांक ०३/०९/२०११ रोजी दाव्यामध्ये दुरुस्ती केली होती. त्यानंतर सदरचा दावा हा प्रतिवादी क्र. १ च्या पुराव्यासाठी ठेवण्यात आला होता. वादीने दाव्यातील इतर घडामोडींची शहाणीशा न करता सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. वादीने सदरचा दावा मुळ वादी यांनी अडचन असल्यामुळे मुखत्यारामार्फत दाखल केला होता. तसेच सदर दाव्यात सुरेश सकुंडे यांनी सर्व वादींच्या वतीने न्यायालयात जबाब दिलेला असुन उलटतपास झालेला आहे. अशा परिस्थीतीत वादीने यथायोग्य तत्परतेने सदरचा अर्ज करण्यास अडचणी नव्हत्या त्यामुळे योग्य कारणा अभावी सदरचा अर्ज नामंजुर करण्यास पात्र आहे.

६. प्रतिवादीच्या मते वादीने पुर्वीच दुरुस्ती अर्ज व वादीचा पुरावा या वादीच्या वर्तनावरुन वादीने दावा मिळकती बाबतचा हक्क सोडून दिलेला असल्याने पुन्हा त्याबाबत वादीस दाव्यात दुरुस्ती करुन मागता येणार नाही. गट नं. २९५ मधील ५ आणे ४ पै चा हिस्सा हा शोभा व शितल यांचे स्वतंत्र खरेदी मालकीचा हिस्सा असल्याने सदर हिस्सा दावा मिळकतीमधुन या दाव्यात सामील करता येणार नाही. वाटपाच्या दाव्यामध्ये एकत्र कुटुंबातील सदस्यांनी वाटपाबाबत मागणी करेल त्यावेळेस तो वेगळा झालेला आहे असे गृहीतक आहे. त्यामुळे दावा प्रलंबीत असताना एखाद्या सदस्यांने मिळकत घेतल्यास दाव्यात समाविष्ठ करता येणार नाही. वादी अर्ज कलम ३ मध्ये करु पाहत असलेली दुरुस्ती

ही दाव्याच्या अंतीम निर्णयासाठी कोणत्याही प्रकारे गरजेची नाही. मुलतः वादीने दावा कलम १ब मध्ये ५ आणे ४ पै चा हिस्सा यापुर्वीच दुरुस्तीने कमी केलेला आहे. त्यामुळे पुन्हा तो वादीस समाविष्ठ करता येणार नाही.

७. केवळ प्रकरण प्रलंबीत ठेवण्यासाठी वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. वादी करु पाहत असलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची नसुन त्यामुळे वादीचे व दाव्याच्या स्वरुपात बदल होत आहे. इतकेच नव्हेतर प्रतिवादी क्र. १ च्या बचावास बाधा पोचत आहे. पुरावा देत असताना वादी सदरची बाब का मांडू शकला नाही याचे कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण वादीने या अर्जात दिलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र. १ तर्फे करण्यात आली.

८. प्रस्तावीत प्रतिवादी यांनी त्यांचे सविस्तर म्हणणे निशाणी १९० वर दाखल केले व अर्जातील कथनांना तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे. प्रस्तावीत प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचे म्हणणे दाखल केले व सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

९. वरीलप्रमाणे वादी चा अर्ज त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे व इतर कागदपत्रे पाहता तसेच वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| **अ.न.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी यांनी दावा दुरुस्तीसाठी योग्य व संयुक्तीक कारण दिले आहे का ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २ | नियोजीत दावा दुरुस्ती ही दाव्याचा अंतीम निकाल करण्यास मदत करणारी आहे का? | होय. |
| ३. | काय आदेश? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमान्सा

**मुद्दा क्र. १ व २ करीता–**

१०. वरील दोन्ही मुद्दे संलग्न असल्यामुळे ते एकत्रीत विचाराधीन घेतलेले आहेत.

११. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, गट नं. २९५ मधील मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मिळकत आहे. सदर मिळकतीपैकी सामाईकातील ५ आणे ४ पै. चा दक्षिण बाजुचा हिस्सा निवृत्ती सकुंडे यांनी २५,०००/– रुपयास गहाण स्वरुपी मुदत खरेदीने दिल्याचे व सदर हिश्श्याने निवृत्ती सकुंडे यांनी प्रतिवादी क्र. १ ची मुले अशोक व आण्णा सकुंडे यांच्या बायका शोभा व शितल यांना प्रस्तुत दावा चालु असताना खरेदीखत दस्त क्र. २६१९/२०१३ विक्री केलेला आहे. वादीच्या मते सदर दस्ताची माहीती त्यांना जुलै २०१९ मध्ये शेजाऱ्यांकडून समजली. सदर दस्ताची नोंद ७/१२ सदरी दिनांक २४/०६/२०१८ रोजी झाली. वादी हे परगावी राहत असल्याने त्यांना या बाबतची माहीती मिळाली नाही. त्यामुळे ते दाव्यामध्ये गट नं. २९५ मधील संपुर्ण हिस्सा समाविष्ठ करुन खरेदीदार यांना दाव्यामध्ये समाविष्ठ करु इच्छीतात व त्या अनुशंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मागीतली आहे.

१२. प्रतिवादीच्या वतीने असा युक्तीवाद करण्यात आला की, वादींनी यापुर्वी

निशाणी ६७ वरील अर्जाप्रमाणे गट नं. २९५ मधील हिस्सा कमी केलेला आहे. त्यामुळे पुन्हा वादी यांना सदरचा अर्ज दाखल करुन गट नं. २९५ मधील कमी केलेला हिस्सा मागता येणार नाही. वादीने सदरचा अर्ज दाखल करताना महत्वाची माहीती लपवुन ठेवलेली आहे.

१३. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, यापुर्वी वादी यांनी निशाणी ६७ खाली दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये वादी यांनी गट नं. २९५ मधील मिळकतीतील १० आणे ८ पै. हिच्या संदर्भात दुरुस्ती मागीतली होती. प्रस्तुत अर्जातील दुरुस्तीने वादी हे गट नं. २९५ मधील संपुर्ण ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत असल्याचे कथन करतात. प्रस्तुत प्रकरणात नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, निशाणी ६७ वरील अर्जामध्ये वादीने कोठेही गट नं. २९५ मधील त्याचा उर्वरीत हिस्सा सोडून दिला आहे असे कथन केलेले नाही. निशाणी ६७ वरील दुरुस्ती ही ७/१२ वरील नोंदी प्रमाणे करण्यात आलेली आहे असे त्या अर्जामध्येच नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी कथीत केल्याप्रमाणे निशाणी ६७ वरील अर्जाप्रमाणे वादी याने गट नं. २९५ मधील त्याचा हक्क हा सोडून दिला आहे असे म्हणता येणार नाही.

१४. प्रस्तुत प्रकरणात गट नं. २९५ संदर्भातील खरेदीखत हे दावा प्रलंबीत असताना झालेला आहे. वादी असे कथन करतो की, सदर संपुर्ण मिळकत ही त्यांची वडीलोपार्जीत मिळकत आहे. सदर मिळकत ही वडीलोपार्जीत आहे का कसे हे पाहण्यासाठी सविस्तर न्यायचौकशीची आवश्यक्ता आहे. त्या संदर्भात पुरावा देण्याची संधी दोन्ही पक्षकारांना आहे. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. वाटपाच्या

दाव्यामध्ये सर्व दावा मिळकती समाविष्ठ करणे हे कायद्याने अपेक्षीत आहे. तर सदर अर्ज नामंजूर केला तर वादीचे अपरीमीत नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही व सदर मिळकतीस मुकावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१५. प्रस्तुत प्रकरणात वादीने त्याच्या दाव्यामध्येच तो गावामध्ये राहत नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच वादीने अर्जासोबत शपथपत्र दाखल करुन त्याला २०१३ च्या खरेदीपत्राविषयी माहीती नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे वादीने अर्ज दाखल करण्यास यथायोग्य तत्परता दाखविली नाही असे म्हणता येणार नाही. तसेच प्रस्तावीत प्रतिवादीने असे कथन केले आहे की, सदर मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत नाही. परंतु, येथे नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, वादीने शपथपत्र दाखल करुन अर्जात नमूद मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत आहे असे कथन केले आहे. मिळकतीचे स्वरुप काय आहे हे पाहण्यासाठी सविस्तर न्यायचौकशीची आवश्यक्ता आहे. या अर्जामध्ये दाव्यातील मिळकतीचे स्वरुप ठरु शकत नाही. त्यामुळे सद्य स्थीतीत अर्जातील नमूद मिळकतीच्या स्वरुपा विषयी भाष्य करणे उचीत ठरत नाही.

१६. प्रस्तावीत दुरुस्ती ही दाव्याचा अंतीम निकाल देण्यासाठी आवश्यक आहे. तसेच दाव्यातील खरेखुरे प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रस्तावीत दुरुस्तीला परवानगी देणे आवश्यक आहे. प्रस्तावीत दुरुस्ती ही प्रतिवादीवर अन्यायकारक नाही. तसेच दाव्यामध्ये निकाल देताना कोणतीही संदिग्धता राहु नये यासाठी प्रस्तावीत दुरुस्ती ही आवश्यक आहे. वादीने जो सदर अर्ज दाखल करण्यास विलंब केला आहे त्याबद्दल वादीवर खर्च बसविणे न्यायोच्चीत ठरते. त्यामुळे सदर अर्ज खर्चावर मंजूर होणे योग्य व न्यायोच्चीत होईल.

सबब, मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र. ३ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश.</u>**

१. निशाणी १५१ वरील अर्ज २०००/– रुपयांच्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावीत दुरुस्ती मुदतीत करुन घ्यावी व प्रस्तावीत दुरुस्तीनंतर दाव्याचे समन्स नियोजीत प्रतिवादी यांना पाठविण्यात यावेत.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ यांना देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2022.04.25 14:59:32 +0530

कोरेगाव
दि. २०/०४/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.